लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps · GET IT ON Google play

महाराष्ट्र शासन, राज्य कौशल्य,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (MSBSVET) मान्यताप्राप्त
Skill India
अभ्यासक्रम आयटीआय ट्रेड समकक्ष कोर्सेसला प्रवेश सुरु आहे.
इलेक्ट्रीशियन कालावधी-२ वर्ष
कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (स्थापत्य अभियंता सहाय्यक) कालावधी-१ वर्ष
• गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर रजिस्ट्रेशन व लायसन्स काढता येते.
DMLT कालावधी-२ वर्ष डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन
DMLT चे महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिलला रजीस्ट्रेशन होते.
• केंद्र शासनाची अप्रेन्टीसशिप (Apprenticeship) लागू (Govt. of India)
अभिनव टेक्नीकल इन्स्टिट्युट रेल्वे स्टेशन जवळ, ZP रोड, वाचनालय समोर, जळगांव मो.-9423488174 ,7040416582

जळगाव, बुधवार, दि.८ ऑक्टोबर २०२५ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -३२९ • पाने ६ • किंमत ३ रु.

## सोने-चांदी

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : १,१७,४३०
- **चांदी** (प्रति १ किलो): १,४४,११०

## तापमान

- **कमाल** : ३३ अंश सेल्सिअस
- **किमान** : २३ अंश सेल्सिअस

## महत्वाचे »»

### अपघातात बहिण भावाचा मृत्यू

**लातूर :** जिल्ह्यातील राष्ट्राय महामार्गावर हिट अँड रनचा धक्कादायक प्रकार घडला असून भीषण अपघातात बहिण-भावाचा जागीच मृत्यू झाला आहे. औसा-निलंगा राष्ट्रीय महामार्गावर आज दुपारी घडलेल्या भीषण अपघातात वाघोली येथील बहिण-भावाचा जागीच मृत्यू झाला. बोलेरो गाडी आणि ट्रकच्या दरम्यान आलेल्या दुचाकीला दोन्ही वाहनांनी धडक दिल्याने हा अपघात झाला. धडक दिल्यानंतर दोन्ही वाहने घटनास्थळावरून फरार झाली असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. घटनास्थळी स्थानिक व वाहनांनी गर्दी केली होती, पोलिसांना घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करण्यात आला आहे.

### वृद्धावर टोळक्याचा प्राणघातक हल्ला

**पंढरपूर :** पंढरपूरच्या विठ्ठल मंदिर परिसरात एक धक्कादायक घटना घडली आहे. पंढरपुरातील सर्वात जास्त सुरक्षा असणाऱ्या या भागात आज पहाटे वृद्ध भाविकांवर टोळक्यानं प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. यामध्ये वृद्ध गंभीर जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले आहेत. बारा महिने इथे हजारो भाविक दर्शनासाठी गर्दी करत असतात. मात्र आज पहाटे पुणे येथील काही वृद्ध भाविकाला किरकोळ कारणावरून एका टोळक्याने केलेल्या मारहाणीमुळे एक वृद्ध भाविक गंभीर जखमी झाला आहे. तसे पाहता मंदिरासाठी पोलिसांची खास सुरक्षा व्यवस्था नेमलेली आहे.

### आयपीएस अधिकाऱ्याची गोळी झाडून आत्महत्या

**नवी दिल्ली :** हरियाणा कॅडरचे सीनियर आयपीएस अधिकारी वाय पूरन कुमार यांनी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चंढीगड सेक्टर ११ मधील सरकारी निवासस्थानी त्यांनी आत्महत्या केल्याची माहिती आहे. पूरन कुमार हे हरियाणामध्ये अतिरिक्त पोलीस महासंचालक रँकचे अधिकारी होते. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालं नाही. वाय पूरन कुमार हे २००१ बॅचचे आयपीएस अधिकारी होते. आपल्या प्रामाणिकपणा आणि मेहनतीमुळे त्यांची ओळख पोलीस विभागात एक कुशल अधिकारी अशी होती. पोलिसांना घटनास्थळावरून एक पिस्तूल मिळाले आहे. मात्र, आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पूरन कुमार यांच्या पत्नी अमनीत पी कुमार या आयएएस अधिकारी आहे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी 31 हजार कोटीची घोषणा

## शेतकऱ्यांना मिळणार आता नवं घर : देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी सरकारने सर्वात मोठी घोषणा केली आहे. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाची पत्रकार परिषद घेत राज्यातील शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा केली आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या नुकसानीसाठी ही मदत दिली जाणार आहे. ज्या विहिरींमध्ये गाळ जमा झाला आहे त्यासाठी ३० हजार, तसेच वाहून गेलेल्या प्रत्येक जनावरासाठी ३७ हजार रुपये दिले जाणार आहे.

महाराष्ट्राला पावसाचा चांगलाच तडाखा बसला आहे, पावसामुळे शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं. ऐन हातातोंडाशी आलेला घास निसर्गानं हिरावून घेतला. त्यामुळे शेतकरी हातबल झाले आहेत. राज्यात एवढा प्रचंड पाऊस झाली की, अनेक गावांना पुराच्या पाण्याचा वेढा पडला होता. लोकांच्या घरात पाणी घुसलं होतं. अनेक गावांचा सर्पक तुटला होता. पावसामुळे अनेकांचे घरं पडले, तर काहींच्या घरात पाणी घुसून मोठं नुकसान झालं. दरम्यान आज या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पत्रकार परिषद पार पडली,



या पत्रकार परिषदेमध्ये अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी पॅकेजी घोषणा करण्यात आली आहे. सरकारने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानासाठी ३१ हजार ६२८ कोटींच्या पॅकेजची घोषणा केली आहे. सोबतच अनेक महत्त्वाच्या घोषणा देखील करण्यात आल्या आहेत.

सर्वात महत्त्वाची घोषणा म्हणजे राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे ज्यांची घर संपूर्णपणे पडली आहेत, अशा नुकसानग्रस्तांना आता पीएम आवास योजनेतून नव्या घरासाठी मदत केली जाणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांची घरं पूर्णपणे पडली नाहीत मात्र नुकसान झालं आहे, अशा शेतकऱ्यांना देखील आपलं घर तसेच जनावरांचे गोठे पुन्हा दुरुस्त करण्यासाठी देखील सरकार मदत करणार आहे, या निर्णयामुळे ज्यांनी पावसात आपलं घर गमावलं आहे, त्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

यासोबतच अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत, ज्या शेतकऱ्यांची जमीन पावसामुळे खरडून गेली आहे, त्यांना प्रति हेक्टरी साडेतीन लाख रुपये मदतीची घोषणा करण्यात आली आहे, त्यातील ४७ हजार रुपये हे रोख मिळणार आहेत. तर उर्वरीत रक्कम ही मनरेगा मार्फत मिळणार आहे. तसेच पावसामुळे ज्या शेतकऱ्यांच्या विहिरींचं नुकसान झालं आहे, अशा सर्व शेतकऱ्यांना प्रत्येकी तीस हजार रुपयांची विशेष मदत केली जाणार आहे, त्याचबरोबर ज्या शेतकऱ्यांची जनावरं वाहून गेली आहेत, किंवा मृत्यूमुखी पडली आहेत, त्यांना देखील मदतीची घोषणा यावेळी करण्यात आली आहे.

पान २ वर »

# महिला आरक्षणाचा ‘बाऊन्सर’ स्थानिक नेत्यांच्या राजकारणात घातक ठरणार?

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चंद्रपूर** प्रतिनिधी

महाराष्ट्रातील नगरपालिका व नगरपंचायतींमध्ये महिला आरक्षणाचा बाऊन्सर स्थानिक राजकारण्यांच्या जीवावर ठरल्याचे चित्र समोर येत आहे जिल्ह्यातील १७ पैकी ८ नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या विविध प्रवर्गांत महिलांसाठी राखीव झालेल्या नगराध्यक्ष पदांमुळे नेहमीच या पदासाठी दमदाटी करणाऱ्या स्थानिक नेत्यांना मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदाकडे डोळसपणे आपल्या कुटुंबियांना पाठवून निवडणूक जिंकण्याचा राजकीय संघर्ष आता अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

सत्ताधारी भारतीय जनता पक्षासाठी नगराध्यक्षपद एक मोठे संगीत खुर्ची ठरणार असून, विरोधी पक्षांना आता नगराध्यक्ष पदासाठी आपल्या जवळच्या वा कुटुंबाच्या महिलांना मैदानात उतरवून जिंकण्यासाठी जबरदस्त मेहनत करावी लागणार आहे. भद्रावती, राजुरा, वरोरा या नगरपालिकांसारख्या ठिकाणी या निवडणुकीपूर्वीच निर्णय घेण्याची तयारी रंगली आहे. राजकीय

पान २ वर »

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्य सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. विशेष म्हणजे या बैठकीत दोन मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. यातील पहिला निर्णय हा तुकडा बंदीबाबत आहेत. या निर्णयानुसार तुकडा बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता महाराष्ट्रातील छोट्या प्लॉट धारकांना शासनाचा मोठा दिलासा मिळणार आहे. दुसरा निर्णय हा झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात आहेत. या निर्णयानुसार एसआरएमध्ये क्लस्टर योजना राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. या दोन प्रमुख निर्णयांसह इतरही काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.उद्योग विभाग

महाराष्ट्र राज्याचे रत्ने व दागिने धोरण - २०२५ जाहीर करण्यात आले आहे. सोने, चांदीचे दागिने,हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार आहे. एक लाख कोटीं रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितेच उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे.

राज्यातील नागरी भागातील सांडपाण्यावरील प्रक्रियेच्या धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. सांडपाण्यावरील प्रक्रीयेमुळे आणि त्याच्या पुनर्वापराव्दारे चक्रीय अर्थव्यवस्थेस (सर्क्युलर ईकॉनॉमी)ला चालना मिळणार आहे. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, आरोग्यदायी परिसर या संकल्पनेला बळ मिळणार आहे. राज्यातील ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबविण्यात येणार आहे.

तुकडे बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्या ताली आहे. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. अधिनियमातील कलम ८ (ब) चे परंतुक वगळून कलम ९ मध्ये पोट-कलम (३) नंतर परंतुक समाविष्ट करण्यात येणार आहे.

मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) अंतर्गत झोपडपट्टीच्या पुनर्विकासासाठी समूह पुनर्विकास

पान २ वर »

# नृत्यांगना गौतमी पाटीलच्या जीवाला धोका

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी

पुण्यातील अपघात प्रकरणातून गौतमी पाटीलला क्लीनचीट देण्यात आलीय. गौतमी पाटील हिच्या कारचा आणि रिक्षाचा अपघात झाला होता. अपघाताच्या वेळेस गौतमीसुद्धा कारमध्ये होती, असा आरोप करण्यात आला. मात्र अपघातावेळी गौतमी ही कारमध्ये नव्हती, असा खुलासा पुणे पोलिसांनी केला. त्यामुळे पोलिसांकडून गौतमी पाटीलला क्लीनचीट देण्यात आली. मात्र आता गौतमीच्या वकिलांनी मोठा अजब दावा केला.



गौतमी पाटील हिच्या जीवाला धोका होता, अशा दावा तिच्या वकिलांनी केल्याने मोठी खळबळ उडालीय. गौतमी पाटीलला अपघातग्रस्त रिक्षा चालकाला भेटायला जाणार होती, मात्र तिच्या जीवाला धोका होता म्हणून तिने तेथे जाणं टाळलं. गौतमी रिक्षा चालकाला भेटण्यासाठी जाण्याच्या तयारीत होती, मात्र कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, या भीतीने गौतमीने जाणं टाळलं, असा दावा तिच्या वकिलांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला. तसेच शो रद्द करण्याची धमकी आणि अपघाताप्रकरणी राजकीय वळण लागल्यामुळे गौतमी पाटीलने माध्यमांसमोर येणं टाळल्याचं तिच्या वकिलांनी सांगितलंय.

अपघात प्रकरणी पुणे पोलिसांनी गौतमी पाटीलला आपली बाजू मांडण्यासाठी एक नोटीस पाठवली होती. मात्र गौतमीने ८ दिवसानंतर सुद्धा पोलिसांकडे जबाब नोंदवला नाहीये. पोलिसांनी १ तारखेला गौतमीला हजर राहण्यासाठी नोटीस बजावली होती. आज आठ

पान २ वर »

# एच १ बी व्हिसासाठी लागतील ८८ लाख रुपये

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांचं धक्कातंत्र सुरूच आहे, भारतानं रशियाकडून तेल खरेदी करू नये यासाठी ते सातत्यानं दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांनी आधी भारतावर ५० टक्के टॅरिफ लावला, त्यानंतर एच १बी व्हिसाच्या शुल्कामध्ये प्रचंड वाढ केली आहे. आता एच १बी व्हिसासाठी तब्बल १ लाख डॉलर म्हणजेच



भारतीय चलनामध्ये ८८ लाख रुपये मोजावे लागणार आहेत. याचा सर्वात मोठा फटका हा भारताला बसला आहे, मात्र तरीही भारतानं रशियाकडून तेलाची खरेदी सुरूच ठेवली आहे.

त्यानंतर आता आणखी एक मोठा धक्का डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला दिला आहे, डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या व्हिसाबाबत कडक भूमिका घेतली आहे. याचा परिणाम म्हणजे गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी अमेरिकेकडून जारी करण्यात आलेल्या विद्यार्थी व्हिसामध्ये प्रचंड प्रमाणात घट झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी अमेरिकेकडून दिल्या जाणाऱ्या विद्यार्थी व्हिसामध्ये १९ टक्के घट करण्यात आली आहे. इंटरनॅशनल ट्रेड कमिशनच्या आकडेवारीनुसार २०२४ मध्ये अमेरिकेनं ३

पान २ वर »

# आणखी दोन दिवस मुसळधार पावसाचा अलर्ट

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी



राज्यात पुन्हा एकदा हवामानात बदल होत असून, अरबी समुद्रातील ‘शक्ती’ या तीव्र चक्रीवादळाचा परिणाम आणि परतीच्या मान्सूनमधील बदल यांचा संयुक्त प्रभाव दिसू लागला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुंबई येथील प्रादेशिक हवामान केंद्रानुसार, मराठवाड्यात ७ ते ११ ऑक्टोबरदरम्यान तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. छत्रपती

पान २ वर »

### जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची बदली

**जळगाव** - राज्य सरकारने प्रशासनात महत्त्वाचे बदल केले आहे. सरकारने पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. यामध्ये जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची बदली करण्यात आली असून याबाबतचे आदेश आज निर्गमीत करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची बदली करण्यात आली.

# महाराष्ट्रासाठी दोन नव्या रेल्वे मार्गाला मंजुरी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

केंद्र सरकारने महाराष्ट्राला मोठं गिफ्ट दिलं आहे. मोदी सरकारने महाराष्ट्रातील दोन रेल्वे मार्गांना मंजुरी दिली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील नागरिकांना खूप फायदा होणार आहे. दोन मोठ्या प्रकल्पांना मंजुरी दिली असून हे प्रकल्प ११ हजार ४२० कोटी रुपयांचे असणार आहेत. या रेल्वे मार्गामुळे महाराष्ट्र शेजारच्या राज्याला जोडला जाणार आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यामध्ये भुसावळ ते वर्धा तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेला मंजुरी देण्यात आली आहे. हा रेल्वे मार्ग ३१४ किलोमीटर लांबीचा असणार आहे. या प्रकल्पाचा खर्च ९११७ कोटी रुपये असणार आहे. या रेल्वे मार्गाचं काम २०३० पर्यंत पूर्ण होईल. केंद्र सरकारने आणखी एक नवा रेल्वे मार्गाला मंजुरी दिली आहे. यामुळे महाराष्ट्र आणि छत्तीसगड जोडले जाणार आहे. हा नवीन रेल्वे मार्ग गोंदिया ते दोडडगदरम्यान होणार आहे. हे कामदेखील २०३०-२१ पर्यंत पूर्ण होईल, असं सांगण्यात येत आहे. हा रेल्वे मार्ग ८४.१० किलोमीटर लांब असणार आहे. या नवीन रेल्वे मार्गामुळे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्ये जोडली जाणार आहे. यामुळे दुरंग जंक्शन

पान २ वर »

# महाराष्ट्राचा यूएईवर 10 गडी राखून दणदणीत विजय

## अनुभूती निवासी स्कूलमधील सीआयएससीई-१७ वर्षांखालील क्रिकेट राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

अनुभूती निवासी स्कूलच्या पटांगणावर सुरु असलेल्या सीआयएससीई-१७ वर्षांखालील क्रिकेट राष्ट्रीय अजिंक्यपद-२०२५ स्पर्धेला सोमवारी सुरुवात झाली होती. स्पर्धेचा दुसरा दिवस महाराष्ट्राच्या संघाने गाजवला. पहिल्या दिवशी मिळालेल्या विजयाची मालिका महाराष्ट्राने दुसऱ्या दिवशीही कायम ठेवली. महाराष्ट्राने मंगळवारी झालेल्या सामन्यात यूएईच्या संघावर १० गडी राखून दणदणीत विजय मिळवला. यामुळे उपांत्यफेरीत पोहचण्याचा महाराष्ट्राचा दावा अधिक प्रबळ झालेला आहे.



सीआयएससी स्पर्धेतील दुसरा दिवस महाराष्ट्राने गाजवला. दुपारच्या सत्रात महाराष्ट्र आणि यूएई यांच्यात लढत होती. या लढतीची नाणेफेक सौ.ज्योती अशोक जैन यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी जैन स्पोर्ट्स अकॅडमीचे प्रमुख अरविंद देशपांडे, प्रशिक्षक तन्वीर अहमद आणि क्रीडा समन्वयक रवींद्र धर्माधिकारी उपस्थित होते. तसेच यावेळी आंध्र प्रदेश आणि यूएई सामन्यात नाबाद ६३ धावांची खेळी करणाऱ्या शंतून याचा सौ.ज्योती जैन यांच्या हस्ते सामनावीर पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

महाराष्ट्राने नाणेफेक जिंकत यूएईला प्रथम फलंदाजी दिली. महाराष्ट्राचा गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत यूएईचा फलंदाजांना जखडून ठेवले. यूएईचा संघ १५ षटकांत ८ गडी गमवात ७७ धावाच करु शकला. महाराष्ट्राकडून अनुग्रह डोंगरने सर्वाधिक तीन गडी बाद केले. तनिष जैन याने एक आणि समकित मुथा यान

पान २ वर »

### बुधवारी उपांत्यफेरीच्या लढती

सीआयएससीई-१७ वर्षांखालील क्रिकेट राष्ट्रीय अजिंक्यपद-२०२५ स्पर्धेत उपांत्यफेरीच्या लढती बुधवारी होणार आहे. अ गटातील सर्वाधिक गुण मिळवणार संघ ड गटातील प्रथम स्थानी असणाऱ्या संघासोबत खेळणार आहे. तसेच ब आणि क गटातून प्रथम स्थानावर असलेल्या संघात उपांत्यफेरीचा दुसरा सामना होणार आहे. त्यानंतर गुरुवारी निर्णायक सामना खेळला जाईल.

राख सावळणा एवं उठावणा



स्व.स्वरूपचंदजी चंपलालजी तालेरा
उम्र :७५, निधन -दि.६-१०-२०२५
इनका राख सावळणा कल सुबह दि.0८-१0-२०२५
वार:- बुधवार को ७:00 बजे और उठावणा
प. पू.महासतियाजी सुशीलाजी मा.सा.आदी ठाणा ४ के उपस्थिती मे कल सुबह १0:00 बजे जैन स्थानक फत्तेपूर यहापर ही रहेगा.
पगडी रसम
पगडी का कार्यक्रम कल दि.८-१0-२०२५ वार:- बुधवार को दोपहर मे २:00 बजे आरधना भवन फत्तेपूर यहापर ही रहेगा
...शोकाकुल...
समस्त तालेरा परिवार, फत्तेपूर

**पान १ वरून**

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी ३१...

तर इन्फ्राक्ट्रक्चरसाठी दहा हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ही मदत दिली जाणार आहे. याबाबत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, 'ही दिवाळी काळी होऊ देणार नाही अशी आमची भूमिका आहे, त्यामुळे दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत दिली जाईल. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. पंजाब, तामिळनाडू कर्नाटकपेक्षा जास्त निधी आपण दिला आहे. पीक विम्याचीही मदत दिली जाणार आहे. शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही. सर्व निकष आणि अटी-शर्थी बाजूला ठेवून मदत केली जाणार आहे.

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक...

योजना राबविण्यात येणार आहे. अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई बस योजनेअंतर्गत ई-बस डेपो व चार्जींग व्यवस्थेकरिता मौजा बडनेरा येथील २ हेक्टर ३८ आर जमीन ३० वर्षासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक निवासी आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन आश्रमशाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.. अशा ९८० आश्रमशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे.

खासगी सूतगिरण्यांना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत सहकारी सूतगिरण्यांप्रमाणे युनीट मागे ३ रुपये वीज अनुदान सवलत लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य औद्योगिक समुह विकास योजनेंतर्गत क्लस्टरमधील सुतगिरण्यांना दिलासा मिळणार आहे. यंत्रमागधारकांना वीज सवलतीचा लाभ घेण्यासाठी वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागणार आहे. शासन निर्णय जारी झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत नोंदणी करावी लागणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले येथे वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय, या न्यायालयाकरिता आवश्यक पदांना मान्यता देण्यात आली आहे.

## महिला आरक्षणाचा 'बाऊन्सर'..

बॅनरबाजी चार महिन्यांपूर्वी सुरू झाली असली, तरी महिला आरक्षण जाहीर झाल्यानंतर काही गटांसाठी ही बॅनरबाजी थोडी थंडावल्याचे दिसते. या काळात अनेकांनी स्वतःला भविष्यातील नगराध्यक्ष किंवा नगरसेवक म्हणून ओळख करून देण्याचा प्रयत्न केला होता, पण आता वार्ड आरक्षणाच्या निर्देशांची वाट पाहणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे.

मूल शहर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदावर पुन्हा एकदा नागरिकांच्या मागास प्रभागातील महिलांसाठी आरक्षण जाहीर झाल्यामुळे शहरातील मतदारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. गत निवडणुकीत या पदावर अर्जदार महिला (खुला प्रवर्ग) निवडून आल्या होत्या; तत्कालीन काँग्रेस पक्षाच्या उमेदवारासमवेत भाजपाच्या रत्नमाला भोयर या नगराध्यक्षपदावर आल्या होत्या. आता पुन्हा आरक्षण बदलून नाममात्र प्रवर्गातील महिला राखीव झाल्याने मतदारांमध्ये नकारात्मक भावना वाढल्याची चर्चा आहे. माजी नगराध्यक्ष सौ. रत्नमाला भोयर यांचाही पुढील निवडणुकीत इच्छुक असण्याची माहिती आहे.

भारतीय जनता पक्षातर्फे उमेदवारीसाठी मोठ्या संख्येने वादविवादांची शक्यता असून, आतापर्यंत सौ. किरण कापगते, माजी नगराध्यक्ष सौ. रत्नमाला भोयर, भाजपा महिला आघाडी प्रमुख मनिषा गानलेवार, भाजपा महिला शहर आघाडी उपाध्यक्ष सारी कामे वासेकर, माजी नगराध्यक्ष सौ. उषाताई शेंडे या नावांची चर्चा चालू आहे. काँग्रेस ही मूल नगरपालिकेतील मुख्य विरोधी पक्ष असून, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोषसिंह रावत यांच्या नेतृत्वाखाली पक्ष निर्णय करत आहे. महिला आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर काही प्रतिस्पर्धी बाहेर पडत नसल्याचे दिसते, त्यामुळे निवडणुकीत उमेदवार नजीकच्या सहकारी मंडळींना वा कुटुंबियांना संधी देण्याचे संकेत आहेत. भाजपातर्फे निवडणूक उमेदवारासाठी कोणतीही वादविवाद झाली तरी माजी मंत्री सौ. शोभाताई फडणवीस यांची सहमती अंतिम आणि निर्णायक ठरणार असल्याचे भूमिकेत आहेत.

## आणखी दोन दिवस मुसळधार...

संभाजीनगर व जालना जिल्ह्यांत ७ ऑक्टोबरला तर लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत ८ व ९ ऑक्टोबरला मेघगर्जना व वादळी वाऱ्यासह पाऊस पडू शकतो. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ४० किमीपर्यंत जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, मराठवाड्यात पुढील चार-पाच दिवसांत कमाल तापमानात किंचित वाढ होईल, तर किमान तापमानात फारसा बदल होणार नाही, असंही हवामान खात्याने म्हटलं आहे.

'शक्ती' चक्रीवादळाने ६ ऑक्टोबरच्या संध्याकाळी पश्चिम-मध्य आणि वायव्य अरबी समुद्रावर वेग घेतला. हे वादळ सध्या मसिरा (ओमान) पासून सुमारे १८० किमी आग्नेयेस, कराचीपासून ९३० किमी नैऋत्येस आणि द्वारकापासून ९७० किमी पश्चिम-नैऋत्येस स्थित आहे. पुढील काही तासांत त्याची तीव्रता कमी होत कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतरित होईल, अशी शक्यता आहे. मात्र, वादळी वाऱ्यांच्या दिशेत झालेल्या बदलामुळे महाराष्ट्रात पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, पुढील ४८ तासांत राज्यातील अनेक भागांमध्ये पाऊस होऊ शकतो. यलो अलर्ट : मराठवाडा, उत्तर कोकण, उत्तर व पूर्व विदर्भ मुसळधार पावसाची शक्यता : ठाणे, पालघर, कोकण किनारपट्टी आणि पूर्व विदर्भातील काही जिल्हे. चक्रीवादळ अन् परतीच्या पावसाचा प्रभाव! लातूर धरशिवसह कोकण, मध्य महाराष्ट्रात दोन दिवस मुसळधार पावसाचे अलर्ट ७ ऑक्टोबर रोजी पालघर, ठाणे, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे नंदुरबार, जळगाव, संभाजीनगर, जालना, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात यलो अलर्ट आहे. तर बहुतांश मध्य महाराष्ट्रात व मराठवाड्यात हल्या पावसाचा अंदाज आहे . ८ ऑक्टोबर रोजी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट आहे. उर्वरित ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता. ९ ऑक्टोबर रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूरमध्ये यलो अलर्ट . १० ऑक्टोबर रोजी कोल्हापूर सिंधुदुर्ग जिल्ह्यात तर नंतर पाऊस ओसरणार आहे.

## नृत्यांगना गौतमी पाटीलच्या ...

दिवस होऊनही गौतमी पाटील पोलीस स्टेशनमध्ये हजर झाली नाहीये. पोलिसांचा आदेश झुगारुन गौतमी पाटीलचे शो दणक्यात सुरू आहेत. या प्रकरणात पोलिसांनी तब्बल १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यानंतर अपघातावेळी फक्त गौतमी पाटीलचा चालक वाहनात उपस्थित होता हे स्पष्ट झाले. पुणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघाताला गौतमीच्या कारचा चालक जबाबदार आहे. अपघाताच्या वेळी ती वाहनात नव्हती. पोलिसांनी अपघात स्थळापासून भोरपर्यंतचे शेकडो सीसीटीव्ही तपासले. त्यात गौतमी पाटील कुठेच दिसले नसल्याचं पोलिसांनी सांगितलं.

## महाराष्ट्रासाठी दोन नव्या रेल्वे...

आणि नागपूर, बल्लारशाह जंक्शनमधील मालवाहतूकीसाठी बायपास तयार होणार आबे. या मार्गामुळे शेती, खाणकाम अशा अनेक व्यवसायांना चालना मिळणार आहे.

## महाराष्ट्राचा यूएईवर १० गडी...

दोन गडी बाद केले. ७८ धावांचे सोपे आव्हान घेऊन मैदानात उतरलेले महाराष्ट्राच्या दोन्ही सलामीवीरांनी जोरदार फटकेबाजी केली. शारव शहा याने २४ चेंडूत ३१ तर आदर्श गव्हाणे याने २४ चेंडूत ४१ धावा केल्या. या दोन्ही फलंदाजांनी ७.४ षटकांत नाबाद राहत संघाला विजय मिळवून दिला.

मंगळवारी सकाळच्या सत्रात पहिला साखळी सामना बिहार- झारखंड विरुद्ध तामिळनाडू-पाँडेचरी यांच्यात झाला. त्यात बिहारच्या संघाने १३.५ षटकांत केवळ ६८ धावा केल्या. तामिळनाडू संघाने ६९ धावांचे आव्हान ९.४ षटकांत चार गडी गमावत पूर्ण केले. सहा गडीने तामिळनाडू संघाचा विजय झाला. उत्तराखंड विरुद्ध आंध्र प्रदेश यांच्यात झालेल्या सामन्यांत उत्तराखंडने १६ धावांनी विजय मिळवला. उत्तराखंडने १५ षटकांत ८ गडी गमावत ९३ धावा केल्या होत्या. परंतु आंध्र प्रदेशचा संपूर्ण संघ ७७ धावांवर १३.५ षटकांत गारद झाला. नार्थ वेस्ट आणि ओडिशा दरम्यान झालेला सामना चुरशीचा ठरला. नार्थ वेस्टने निर्धारित १५ षटकांत ११९ धावा काढल्या होत्या. उत्तरादाखल ओडिशाच्या संघाने १५ षटकांत ५ गडी गमावत ११० धावा केल्या. यामुळे नार्थ वेस्टचा संघ ९ धावांनी विजेता ठरला. नार्थ इंडिया आणि कर्नाटक-गोवा यांच्यातील लढत रोमहर्षक ठरली. या लढतीत नार्थ इंडियाच्या संघाने २ धावांनी विजय मिळवला. नार्थ इंडियाने प्रथम फलंदाजी करत ११४ धावा केल्या होत्या. कर्नाटक संघाने सहा गडी गमावत ११२ धावा केल्या. त्यामुळे नार्थ इंडियाचा दोन धावांनी निसटता विजय झाला. मध्य प्रदेश आणि तामिळनाडू यांच्यात झालेल्या लढतीत तामिळनाडूने एकतर्फी विजय मिळवला. तामिळनाडूच्या भेदक गोलंदजांसमोर मध्य प्रदेशाचा संपूर्ण संघ केवळ २३ धावांवर बाद झाला. २४ धावांचे आव्हान तामिळनाडूने केवळ १.२ षटकांत पूर्ण केले. हा सामना एकतर्फीच ठरला. यूएई आणि आंध्र प्रदेश- तेलंगणा यांच्यातील सामन्यात आंध्र प्रदेशने आठ गडी राखत विजय मिळवला. यूएईने १०५ धावा केल्या होत्या. आंध्र प्रदेशने १० षटकांत १०६ धावांचे लक्ष्य पूर्ण करत विजयाची मोहर उमटवली.

पश्चिम बंगाल आणि नार्थ वेस्ट यांच्यातील सामन्यात पश्चिम बंगालने ३३ धावांनी विजय मिळवला. पश्चिम बंगालने दिलेले १३४ धावांचे आव्हान नार्थ वेस्ट पेलू शकला नाही. त्यांचा संघ निर्धारित १५ षटकांत केवळ ८७ धावाच करु शकला. बिहार आणि मध्य प्रदेश यांच्यातील सामना मध्य प्रदेशने चार गडीने जिंकला. बिहारने १४ षटकांत १० गडी गमावत १०४ धावा केल्या होत्या. मध्य प्रदेशने १४.२ षटकांत सहा गडी गमावत हे लक्ष्य पूर्ण केले. नार्थ इंडिया आणि केरळ यांच्यातील लढतीत केरळचा विजय झाला. नार्थ इंडियाने निर्धारित १५ षटकांत १०२ धावा केल्या होत्या. केरळच्या संघाने १४.२ षटकांत हे आव्हान पूर्ण केले.

# देवीच्या विसर्जनानंतर ट्रॅक्टरने व्यक्तीला चिरडले

लोकशाही न्यूज नेटवर्क
चंद्रपूर प्रतिनिधी

चंद्रपूर शहरात सोमवारी रात्री देवीच्या मूर्तीचे विसर्जन करून परतणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीने एका व्यक्तीला गंभीरपणे चिरडले. या दुर्दैवी घटनेत समोर आलेल्या व्यक्तीला ट्रॉलीच्या मागच्या चाकाखाली जवळजवळ २५ मीटर ओढले गेले. सदर व्यक्ती गंभीर जखमी झाली असून, जिल्हा सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# जळगावचे नवे जिल्हाधिकारी रोहन घुगे

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची बदली झाली आहे. आयुष प्रसाद यांची नाशिक येथे बदली झाली असून त्यांच्या जागी आता



रोहन घुगे हे नवीन जिल्हाधिकारी म्हणून पदभार घेणार. याबाबतचे आदेश आज निर्गमीत करण्यात आले आहेत. राज्य सरकारकडून आज राज्यातील १० आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत.

---

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**
**ग्रामपंचायत ता पारोळा जि जळगाव**

ई-निविदा सूचना क्र. /२०२५/२०२६(**प्रथम वेळ**)

सरपंच ग्रामपंचायत ता पारोळा जिल्हा जळगाव. हे जळगाव जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage rate tender दोन लिफापा पद्धतीने पुढील कामाची ई-निविदा मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | बयाना रक्कम | टेंडर फी रक्कम | आवश्यक ठेकेदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोजे उंदीरखेडे ता.पारोळा जि.जळगाव येथे अटल भूजल अंतर्गत साठवण बंधारा बांधकाम करणे. | १४९८२७३ | - | - | वर्ग ६ व त्या वरील | १२ महिने |
| २ | मौजे मोरफळ ता.पारोळा जि.जळगाव येथे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता २२३६-२३८९ या मुख्य लेखाशिर्षातर्गतसहाय्यक अनुदान योजनेंतर्गत मोरफळी येथे अंगणवाडी बांधकामकरणे कामे करणे. | ११२४९४७/- | - | - | वर्ग ६ व त्या वरील | ६ महिने |

वरील कामाची निविदा प्रपत्रे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.सदर निविदा प्रपत्रे,अटी,शर्ती इ.सदर संकेतस्थळावर दिनांक ०७/१०/२०२५ रोजी ३.०० वाजेपासुन ते दिनांक २१/१०/२०२५ रोजी १८.०० वाजेपर्यत अधिग्रहीत(Download) करता येतील.व इलेक्ट्रानिक फॉरमॅट मध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करता येतील.ऑनलाईल सादर केलेल्या ई निविदा दिनांक २३/१०/२०२५ रोजी १५.०० वा.ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.सदर दिवशी ई निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेच्या सोईनुसार उघडण्यात येतील.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत ता. पारोळा जि.जळगाव**

---

**चाळीसगाव नगरपरिषद, चाळीसगाव**
Chalisgaon Municipal Council,Chalisgaon Dist-Jalgaon
फोन नं. ०२५८९-२२३४१६ Fax no.-२५८९-२२३३९७ Email - chalisgaonnp@gmail.com

न.पा.बांध/२११/२०२५ दिनांक ०७/१०/२०२५

## जाहीर निविदा - [सन२०२५-२६]

मुख्याधिकारी चाळीसगांव नगरपरिषद जि. जळगाव खालील कामांच्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडून निविदा मागवीत आहेत.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | कोऱ्या निविदा संच रक्कम | निविदा फॉर्म व टेंडर डॉक्युमेंट विक्री दिनांक | निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक | काम करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२५-२६ वर्षा करिता चाळीसगाव न.पा हद्दीतील रुपलाल वस्ताद व्यायाम शाळा कॉन्क्रीटिंग काम करणेबाबत. | ८९२६५७/- | ८९२६/- | ५००/- | दि.८/१०/२५ ते दि.१४/१०/२५ | दि.१५/१०/२५ | ६महिने |

**अटी व शर्ती :-**

१] वरील कामांची अधिक माहिती नगरपरिषद कार्यालय चाळीसगाव बांधकाम विभाग सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत मिळेल.

२] महाराष्ट्र शासनाने योग्य ते नोंदणीकृत कंत्राटदार सदरील निविदा सादर करु शकतात.

३] विहित मुदतीनंतर आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

४] एक अथवा सर्व निविदा स्वीकारण्यात अथवा नाकारण्यात अधिकार नगरपरिषद चाळीसगाव यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद चाळीसगांव**

---

**पाचोरा नगरपरिषद पाचोरा जि. जळगाव**
**स्टेशन रोड,पाचोरा जि. जळगाव**
**फोन नं. [०२५९६]२४०१०१,२४०१६६ फॅक्स २४३१५५**
**website:www.pachoranp.gov.in Email - www.copachora @gmail.com**

जा.क्रं./बांध/१५०४/सन२०२५ दि ०७/१०/२०२५

## जाहिर सूचना सन २०२५-२६

मुख्याधिकारी, पाचोरा नगरपरीषद जि. जळगांव यांचेकडून महाराष्ट्र शासन सर्वासाठी घरे-२०२२ या धोरणा अंतर्गत पाचोरा नगरपरीषद क्षेत्रातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमीत करणेकरीता मोजणी नकाशानुसार विद्यमान भुखंडाच्या स्थितीत अनुसरुन प्रचलीत नियमावलीनुसार अभिन्यास तयार करुन विकास योजना मधील आरक्षणे, विकास योजनारस्ते इ. बाबीचे बाधीत होत असल्यास अभिन्यासात दर्शविणे, मालमत्ताधारक यांनी पायाभुत सुविधा नगरपरिषदेमार्फत पुरविणे करीता आवश्यक हस्तांतरण करण्याचे क्षेत्र, निव्वळ क्षेत्र इत्यादी तपशिल नगररचना विभागाशी सल्लामसलत करुन अभिन्यास तयार करुन शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेच्या कामाकरीता खाजगी अनुज्ञप्तीधारक अभियंता यांची नियुक्ती करावयाची आहे.

तरी सदर काम करु इच्छिणारांनी करावयाच्या कामाबाबतची अधिक माहिती व कोरे निवीदा फॉर्म नगरपरीषद कार्यालयात दि. ०८/१०/२०२५ ते १५/१०/२०२५ या कालावधीत रुपये १,०००/- मात्रचा भरणा करुन प्राप्त करुन घ्यावीत. तसेच निवीदा फॉर्म आप आपल्या शैक्षणिक अर्हता तसेच अनुभवाच्या दाखल्यांसह दिनांक १६/१०/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपावेतो नगरपरीषद कार्यालयात सादर करावीत. निवीदा फॉर्म सोबत रुपये ५,०००/- मात्र अनामत रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील. तसेच प्राप्त निवीदांपैकी कोणतीही निवीदा स्विकारणे, नाकारणे अथवा सर्व निवीदा रद्द करणेचा अधिकार खालील सही करणारांकडेस राखुन ठेवण्यात आलेला आहे.

**सही/-**
**[मंगेश देवरे]**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**पाचोरा नगरपरिषद,जि.जळगांव**

---

**नगरपंचायत कार्यालय,मुक्ताईनगर**
**तालुका-मुक्ताईनगर जि.जळगाव**
ईमेल- comuktainagar@gmail.com दुरध्वनी -२३४२१०-०२५८३

न.प.मु./जा.क्र./८०३/२०२५ दिनांक - ०७/१०/२०२५

**मुक्ताईनगर नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६**

**-: जाहीर सूचना:-**

मुक्ताईनगर नगरपंचायतेच्या सन २०२५-२६ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | वार - बुधवार<br>दिनांक ०८/१०/२०२५<br>वेळ - दु.२.००वाजता<br>स्थळ-मुक्ताईनगर नगरपंचायत, मुक्ताईनगर |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करणे. | बुधवार, दिनांक ०८/१०/२०२५ ते सोमवार दिनांक १३/१०/२०२५ |
| ३ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमानित करुन प्रसिध्द करणे | मंगळवार दिनांक - २८/१०/२०२५ |

**टीप :-** विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनावर योग्य निर्णय घेवून आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत करण्यात येतील.

**ठिकाण - मुक्ताईनगर**

**सही/-**
**[श्री.सुभाष जनोरे]**
**मुख्याधिकारी**
**मुक्ताईनगर नगरपंचायत मुक्ताईनगर**

---

**CHANGE IN NAME**

I have changed my name from" SANJAY NARAYAN PARDESHI (old name)" To"SANJAY NARAYAN RAJPUT (New name)

---

**CHANGE IN NAME**

I have changed my name from "VARSHA SANJAY PARDESHI (Old name)" To VARSHA SANJAY RAJPUT (New name)"

---

**प्रति,**
श्रीमती योगिता संजय गायकवाड
झीपरु अण्णा नगर,नशिराबाद
ता.जलगांव जि.जलगांव
पिन -४२५३०९
मो. ९३५९४५३०७२

विषय :फॅमेली पेंशन के दस्तावेज के संबंध हेतु
संदर्भ - DFUAJ मेल दिनांक १६/०९/२०२५

उपरोक्त विषयानुसार आपके दिये हुए फॅमेली पेंशन के दस्तावेज के संबंध श्री लक्ष्मण राजधर तेली इनके सेवा पुस्तीकाके फॅमेली डीटेल फॉर्म आपका नाम सुनंदा लक्ष्मण तेली ऐसा है और आपके लिव्हिंग सर्टिफिकेट मे आपका नाम सुनंदा लक्ष्मण चौधरी ऐसा पाया गया है एवम शादीके बाद आपका नाम योगिता संजय गायकवाड ऐसा है अंत: आपसे अनुरोध है कि आपके नाम बदल का Gazeettee की प्रत तथा न्युज पेपर की कॉपी इस कार्यालय मे प्रस्तुत करे

**सही/-**
**र.मि.सपकाले**
**ओ.आय.सी./अॅड्मिन/[आॅईज व्हर्टिकल]**
**कृते मुख्य महाप्रबंधक**

---

**प्रतिज्ञापत्र**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी साो.**
**भुसावळ/बोदवड यांचे कोर्टात**
**तारीख ०७/१०/२०२५**

**विषय :- मयताचे मिळकतीस वारसांची नावे दाखल करणेबाबत**
**लिहुन देणार :- शेख मुख्तार शेख भिकन, उ. व. ५९ वर्षे धंदा मजुरी**
**रा. प्रतिभा नगर, वरणगांव ता. भुसावळ जि. जळगांव**

कारणे सत्य प्रतिज्ञापत्र लिहून देतो / देते की,मी व माझे मौजे कुटुंब प्रतिभा नगर, वरणगांव ता. भुसावळ जि. जळगाव येथील कायम व मुळ रहिवासी आहे. माझी पत्नी नामे अकिलाबी शेख मुख्तार हया मौजे वरणगांव येथे दिनांक ११/०१/२०२५ रोजी मयत झालेल्या असून त्यांचे मृत्यूपश्चात वारस पती१, मुलगा १, मुली २ असे खालील प्रमाणे वारस आहेत.

वारसांची नावे येणेप्रमाणे

| अ.नं. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | शेख मुख्तार शेख भिकन | ५९ | पती |
| २ | शेख मुस्ताक शेख मुख्तार | ३५ | मुलगा |
| ३ | कौसर बी शेख मुख्तार | ३७ | मुलगी |
| ४ | शबनम बी शेख मुख्तार | ३२ | मुलगी |

येणेप्रमाणे मयतास वारस असून वरील वारसांचे व्यतिरिक्त मयतास इतर अन्य कोणीही वारस नाहीत. मयताचे उपरोक्त वारस हे कायदेशिर व खरे वारस आहेत. सदर बाबत कोणताही खोटेपणा नाही. सदर मिळकत माझी पत्नी **अकिलाबी शेख मुख्तार हिने दस्त क्रमांक १२६२/२०२० दि. ०७/०८/२०२० अन्वये खरेदी केलेली असल्याने** सदर मिळकत माझी मयत पत्नी हिचे स्वसंपादीत मालकीची असल्याने सदर मिळकतीस पती यांना सुध्दा वारस लावण्यात आलेले आहे. मयताचे नावे **मौजे वरणगांव येथील गट नंबर ५८७ यातील प्लॉट नंबर ८ यांसी नविन नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ५/१७६० व जुना नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ८७२१ ही / हया मिळकत /मिळकतीत हिस्सा असून** सदर मिळकतीस / मिळकतीतील मयताचे हिश्यास मयताचे वर प्रमाणे वारसांची नोंद संबंधीत मा. मुख्याधिकारी,नगरपरिषद वरणगांव यांनी करणेकामी मी हे सत्य प्रतिज्ञापत्र लिहून दिलेले आहे. उपरोक्त मजकुर अगदी बरोबर व खरा असून त्यात कोणताही खोटेपणा नाही तसा प्रकार निघाल्यास त्यास मी भारतीय न्यायसंहिता २०२३ या कायद्याच्या कलम २३६, २३७ नुसार मी गुन्हयास पात्र राहील याची मला जाणीव आहे व कलम २२९ [२] नुसार शिक्षेस व दंडास पात्र राहील. सदर मजकुराचे खरेपणाकरीता मी कार्यकारी दंडाधिकारी/ मे. नोटरी पब्लीक भुसावळ यांचे समक्ष सही केलेली आहे.

**प्रतिज्ञापत्र करुन देणाराची सही**
**शेख मुख्तार शेख भिकन**

---

**जाहिर नोटीस** अॅड.ए.आर.चंदेले ।

**जामनेर येथील सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जामनेर जि. जळगाव यांच्या न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं. १८८/२०२५**
**निशाणी ०७**
**चौकशी तारीख १२/११/२०२५**

**अर्जदार :-** १]विजयसिंग किसन पाटील, उ. व. ५४,धंदा शेती [२] अजबसिंग किसनसिंग पाटील, उ. व. ५० धंदा शेती, दोघे रा. मोयगांव ता. जामनेर जि. जळगांव

**//विरुध्द//**

कोणीही नाही ..... **सामनेवाला**

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्टप्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी...**

१] या कामी अर्जदारातर्फे मे. कोर्टात अर्ज असा की, अर्जदार हे वर नमुद पत्यावरील कायमचे रहिवासी असून आजही ते वर नमुद पत्यावर राहतात. तसेच अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा **स्वर्गीय किसन लक्ष्मण महाले [पाटील]** यांचे वारस आहेत असा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे अर्जदार नं. १ व २ हे सख्खे भाउ असून अर्जदाराचे **वडील नामे किसन लक्ष्मण महाले [पाटील] हे ता. ०१/०८/२००५ रोजी मोयगांव बु.** ता. जामनेर जि. जळगाव येथे मयत असून अर्जदाराची **आई नामे मथुराबाई किसन पाटील हे देखील ता. १४/०५/२०१३ रोजी मौजे मोयगांव बु.** ता. जामनेर जि. जळगांव येथे मयत झालेले असून मयतांना अर्जदारांशिवाय अन्य कुणीही कायदेशीर वारस नाही. तसेच मयत **स्वर्गीय किसन लक्ष्मण महाले [पाटील] यांची आई यापुर्वीच मयत झालेली आहे.** तसेच अर्जदारांना बहीण नव्हती व नाही.[२] असे की, **स्वर्गीय किसन लक्ष्मण महाले [पाटील]** हे मयत झालेले असल्याने अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामकाजाकरीता मयताचे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याने तसा वारस दाखला महसुली अधिकारी यांचेकडे **तारीख १५/०९/२०२५ रोजी** मागणी केली असता त्यांनी सदरील वारस दाखला तुम्हांस मे न्यायालयाकडून काढावा लागेल असे सांगितले म्हणून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याने शासकीय व निमशासकीय कामाकजाकरीता वारस दाखला गरजेचा आहे. म्हणून अर्जदार हे मयत **स्वर्गीय किसन लक्ष्मण महाले [पाटील]** यांचे कायदेशीर वारस वारस असल्याबाबतचा वारस दाखला [ Legal hair-ship Certificate ] मिळावा म्हणून सदरील अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग झाले आहे. [३]असे की, त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे **मयत स्वर्गीय किसन लक्ष्मण महाले [पाटील]** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. १२/११/२०२५ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशिर वारस असल्याबद्दलचे सर्टिफिकेट देईल.आज दिनांक **२६/०९/२०२५** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

**सही/-** **कोर्टाचा शिक्का** **हुकूमावरुन**
**क. लिपीक** **सही/-**
**सहा.अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर जामनेर**

# सेंद्रिय शेतीच्या ओढीने...

**सध्या लोकांना पोषक, आरोग्यदायी खायचं आहे. म्हणूनच सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या फळं आणि भाज्यांना मागणी वाढते आहे. नोकऱ्यांची कमतरता असणाऱ्या काळात सेंद्रिय शेती हा उत्पन्नाचा चांगला मार्ग बनला आहे. कर्नाटकच्या अमोघ जगतापनेही एमबीए केल्यानंतर सेंद्रिय शेती करायला सुरूवात केली. त्याच्या भरारीविषयी...**

**अचिव्हर**

इंजिनिअरींग, एमबीए केलेले अनेक तरुण शेतीकडे वळत आहेत. आयटी किंवा कॉर्पोरेट क्षेत्रातल्या धकाधकीपेक्षा त्यांना नैसर्गिक वातावरणात शेती करणं आवडू लागलं आहे. कर्नाटकचा अमोघ जगताप अशाच काही तरुणांपैकी एक. अमोघला लहानपणापासूनच शेतीची ओढ लागली. शहरापासून दूर, निवांत ठिकाणी त्याच्या वडिलांनी फार्महाउस विकत घेतलं होतं. २० एकर परिसरात पसरलेल्या या फार्म हाउसच्या आसपास शेतीची चांगली संधी असल्याचं अमोघने हेरलं. त्याने बंगळूरूतून एमबीए केलं. यानंतर कॉर्पोरेट क्षेत्रात जायचं की शेतीकडे वळायचं याचा निर्णय त्याला घ्यायचा होता. कॉर्पोरेट ऑफिसच्या कार्यालयात राबण्यापेक्षा जमीन कसायचा निर्णय त्याने घेतला आणि २०१६ मध्ये सेंद्रिय शेतीची सुरूवात केली. तो विविध धान्यं, डाळी, फळं, भाज्यांचं पीक घेतो. या माध्यमातून निसर्गाच्या जवळ जाण्याचा त्याचा प्रयत्न आहे. तो शेतीतून वर्षाला ७ ते १० लाखांपेक्षा जास्त उत्पन्न घेतो. इतकंच नाही, तर तो पशुपालन आणि कुक्कुटपालनाचा व्यवसायही करतो.

यासाठी त्याने विविध संकल्पना लढवल्या आहेत. एकाच हंगामात जमिनीच्या एकाच तुकड्यावर दोन प्रकारची पिकं घेण्याचा प्रयोग त्याने केला. तो यशस्वी ठरला. कर्नाटकमधल्या मल्लावल्लीतल्या त्याच्या शेतात नारळाची ८०० झाडं आहेत. रक्तचंदनाची आणि साध्या चंदनाची प्रत्येकी एक हजार झाडं आहेत. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून तो पाण्याची बचत करतो.



विक्रीच्या बाबतीतही त्याने नव्या पद्धती आणल्या आहेत. मध्यस्थांना त्याने बाजूला सारलं आहे. आपली उत्पादनं थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ग्रीन व्हॅली नावाचं दुकान त्याने सुरू केलं आहे. मालावल्ली-म्हैसूरला जोडणाऱ्या रस्त्यावर त्याचं हे दुकान आहे. भाज्या, फळं, धान्यांसोबतच मध, गायी-म्हशीचं दूध आणि इतर दुग्धजन्य उत्पादनंही तो विकतो. मुख्य रस्त्यावर शेतकऱ्यांचा बाजार भरवतो. इथे सेंद्रिय शेती करणारे इतर शेतकरीही येतात. आपल्या उत्पादनांची विक्री करण्याची संधी त्यांना मिळते. या निमित्ताने तो अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देतो. इतर शेतकऱ्यांच्या उत्पदनांना योग्य भाव मिळावा असाही त्यांचा प्रयत्न असतो.




## फंडू एसएमएस

✻ तुझे महसूस करने का हर अहसास अजीब है, तू पास है तो पास है, जब दूर है तो भी पास है।


✻ हमें कहां मालूम था की इश्क होता क्या है, बस एक 'तुम' मिले और जिंदगी मोहब्बत बन गई।

✻ मेरे 'शब्दों' को इतने ध्यान से ना पढो दोस्तों, कुछ याद रह गया तो मुझे भूल नहीं पाओगे।

## स्मार्ट टिप्स

### स्मार्टफोनची मेमरी फुल झाली तर...

आपल्या स्मार्टफोनमध्ये बरंच काही साठलेलं असतं. त्यामुळे मेमरी फुल होऊन जाते. अशा वेळी काय करायचं? पाहू या.




✻ अनवॉन्टेड फाईल्स डिलिट करा.

✻ नको असलेले फोटो आणि व्हिडिओ काढून टाका. व्हॉट्स ॲपमधला ऑटो डाउनलोडचा पर्याय काढून टाका.

✻ नको असलेली ॲप्स डिलिट करा.

✻ मोबाईलमध्ये कॅचे साठून राहतात. ते काढून टाका.

## हाऊ टू

### आयफोनचा पासवर्ड विसरलाय?



आयफोनचा पासवर्ड विसरल्यानंतर आपली भंबेरी उडू शकते. हा पासवर्ड मिळवण्यासाठी ॲपलच्या सर्व्हिस सेंटरला भेट द्यावी लागते. अर्थात काही स्टेप्स फॉलो करून आयफोन अनलॉक करता येईल. मात्र यातला डाटा डिलिट होईल.

✻ सर्वात आधी मॅकबुक किंवा विंडोज पीसीमध्ये आय ट्यून्स ॲप डाउनलोड करून ते ओपन करा.


✻ आता आयफोन फोर्स रिस्टार्ट करायचा आहे. यासाठी व्हॉल्यूम आणि पॉवर बटण एकत्र दाबून सोडावं लागेल.

✻ यानंतर तुम्हाला रिस्टोअर किंवा अपडेटचा पर्याय दिसेल. यापैकी रिस्टोअर पर्याय निवडा. यानंतर आयट्यून तुमच्या फोनसाठी सॉफ्टवेअर डाउनलोड करेल. यासाठी साधारण १५ मिनिटं लागतील. यानंतर आयफोन 'रिकव्हरी मोड'मधून बाहेर पडेल.

## व्हॉट्स न्यू?

### योगासने शिका ॲपवर!

फिटनेससाठी हजारो ॲप्स उपलब्ध आहेत. त्यावरून वर्कआऊटसाठी वेगवेगळे व्यायामप्रकार शिकता येतात. आता योगासनांसाठी सुद्धा अशी ॲप्स आली आहेत. या ॲप्सवरून तज्ज्ञांच्या मदतीने योगासनं शिकता येतील. यातील काही ॲप्स विनामूल्य आहेत तर काही ॲप्सवर अत्यल्प फी भरावी लागते. सध्या ॲप्सवरून योगासनं शिकण्याचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अशी ॲप्स तयार होण्याचं प्रमाणही वाढत आहे. पण कोणत्याही ॲपवरून योगासनं शिकताना आधी खातरजमा करून घ्या. ॲपवरील माहिती गुगल किंवा जाणकारांकडून क्रॉसचेक करून घ्या. आपल्या वेळेनुसार योगासनं शिकता येतात हा या ॲपचा महत्त्वाचा फायदा आहे. अनेकांना व्यस्त दिनचर्येमुळे योगासनांच्या क्लासला जाता येत नाही. अशांसाठी ही ॲप्स महत्त्वपूर्ण ठरतात.



## सोशल मिडिया

### असं करा गुगल सर्च...

दोस्तांनो, माहिती कोणतीही असो, ती शोधण्यासाठी आता पुस्तक उघडण्याची गरज राहिलेली नाही. गुगलने आपल्या सगळ्या समस्या सोडवल्या आहेत पण गुगल सर्च करताना काही अडचणी येऊ शकतात. या टिप्सनी तुम्ही झटपट गुगल सर्च करू शकता. ✻ स्पेलिंग सर्च करायचं असेल तर त्या शब्दाशी संबंधित दोन-चार अक्षरं लिहा. या अक्षरांच्या मध्ये '&' किंवा 'or' हा शब्द टाकून सर्च करा. स्पेलिंग लवकर सापडेल. ✻ वेबसाईट सर्च करताना साईटशी संबंधित माहिती लिहा. मध्ये 'ब' चिन्ह टाका. साईट्स मिळतील. ✻ एखाद्या साईटवरचा ठराविक लेख वाचायला असेल तर साईट ॲड्रेस टाकून लेखाचा विषय टाका. लेख लवकर सापडेल. ✻ टायटल किंवा यूआरएल शोधायचं असेल तर intitle: लिहून तो शब्द लिहा. ✻ एकाच प्रकारच्या वेबसाईट्स शोधायच्या असतील तर related: टाकून ती साईट टाका.

# सुपर ट्रेंडी शर्ट्स

**फॅशन पॅशन**

मित्रांनो, एखादा छानसा शर्ट तुमचा लूक पटकन खुलवू शकतो. ऑफिस पार्टी असो, मीटिंग असो किंवा व्हॅलेंटाईन्स डे डेट असो शर्टचे काही ट्रेंडी पर्याय कोणत्याही ऑकेजनची शान ठरतात. टिपिकल प्लेन, स्ट्राईप्स किंवा चेक्सवाल्या शर्टपेक्षा काहीतरी वेगळं ट्राय करायचं असेल तर हे पर्याय खास तुमच्यासाठी आहेत.

✻ कलरब्लॉक्ड म्हणजे दोन रंगांचा सॉलिड शर्ट तुमच्याकडे असायला हवा. त्यातही व्हाईट आणि ग्रे कॉम्बिनेशन खूपच भारी दिसतं. उन्हाळा असो किंवा हिवाळा, पार्टी असो डेट... हा शर्ट कोणत्याही प्रसंगी शोभून दिसेल. अशा शर्ट तुमच्या वॉर्डरोबमध्ये असायलाच हवा.

✻ तुम्हाला प्रिंट्स आवडत असतील तर प्रिंटेड कॉटन शर्ट खरेदी करता येईल. डिसेंट प्रिंट्सचे शर्टही मिळतात. प्रिंटेड व्हाईट शर्ट खूपच खुलून दिसतो. असा शर्ट कोणत्याही रंगाच्या ट्राउझरवर घालता येईल.

✻ तुम्हाला जास्तच स्टायलिश दिसायचं असेल तर प्रिंट आणि स्ट्राईप्सचं कॉम्बिनेशन असणारा शर्ट कॅरी करता येईल. ब्लॅक अँड व्हाईट किंवा व्हाईट अँड ब्लू असं कॉम्बिनेशन तुम्ही करू शकता.

✻ ट्रॉपिकल प्रिंट्स आवडत असतील तर असे शर्ट्स घालता येतील. पांढऱ्या रंगाचा ब्लॉसम प्रिंट कॉटन शर्ट खरेदी करता येईल. हा शर्ट जीन्सवर खूप छान दिसेल. त्यासोबत स्नीकर्स घाला आणि कॅज्युअल दिसा.



✻ सौम्य फ्लोरल प्रिंटवाले शर्ट भाव खाऊन जातात. तुम्ही असे शर्ट घेऊ शकता. पांढऱ्या रंगावर फ्लोरल प्रिंट्स शोभून दिसतात. कॅज्युअल ऑकेजनसाठी जीन्सवर हा शर्ट घाला आणि ऑफिसला जाताना ट्राउझर कॅरी करा.

✻ जिओमॅट्रिक प्रिंट्स इन आहेत. अशा प्रिंटचा पिवळ्या रंगाचा शर्ट शोभून दिसेल. ब्रंच किंवा कॉफी डेटसाठी हा शर्ट परफेक्ट आहे.

✻ पार्टी वेअर प्रिंटेड श
तुमच्याकडे असायला हवा. नेव
ब्लू प्रिंटेड शर्ट खास दिसेल.

✻ एखादा चेक्सवाला
घ्यायला हरकत नाही. थोडे मो
आकाराचे चेक्स शोभून दिसती
नेव्ही ब्लू चेक्स शर्ट हटके दिसेल.

# दाढीधारी बनण्यासाठी

**ग्रुमिंग**

मुलांचा चिकना चुपडा, तुळतुळीत दाढी केलेला चेहरा मुलींना आवडेनासा झाला आहे म्हणे... म्हणूनच का सध्या सगळे गब्रू जवान दाढीधारी झाले आहेत? पण मित्रांनो, हा रफ अँड टफ लूक तुम्हाला खूप छान दिसतो बरं का... गरज आहे ती दाढीच्या जपणुकीची. काही टिप्स फॉलो करा आणि बघा, तुम्हीही रितेश, ऋतिक, अजय, सिद्धार्थ, वरुण, रणवीरच्या पंक्तीत आरामात जाऊन बसाल. अगदी प्राचीन काळापासून दाढी हे पुरुषांच्या शक्तीचं प्रतीक मानलं गेलं आहे. दाट आणि मजबूत दाढी पुरुषांची पोलादी ताकद दर्शवतं. म्हणूनच दाढी राखणं हे अनेक युवकांचं स्वप्न असतं. त्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. पण लक्षात घ्या, दाढी वाढण्याची गती आणि मजबुती वय आणि जेनिटिकवर अवलंबून असते. ✻ दाढी लवकर वाढावी यासाठी आहारात प्रोटीनयुक्त पदार्थांचं सेवन वाढवावं. प्रोटीन्सअभावी दाढी खुरटी राहते. ✻ दाढी वाढवण्याच्या प्रयत्नात असाल तर पुरेशी झोप घ्या. ✻ दिवसातून आठ ग्लास पाणी प्यायलाच हवं. यामुळेही दाढी लवकर वाढेल.



✻ केस गळू नयेत यासाठी तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करा. ✻ वेळोवेळी चेहऱ्यावरील मृत त्वचेचा थर दूर करत राहिल्यास दाढी वाढण्यास मदत होते. त्यामुळे पुरुषांसाठी असणाऱ्या एक्सफोलिएट मास्कचा वापर करेल. नवीन केस येण्यास मदत होईल. ✻ दाढी वाढवण्यासाठी संयम राखायला हवा. एकदा दाढी चांगली वाढली की मधल्या गॅप्स भरल्या जातात आणि हवा तसा लूक मिळतो. ✻ एकदा दाढी वाढली की तिची निगा राखा. यासाठी चांगल्या दर्जाच्या कंडिशनरचा वापर करा. यासाठी एरंडेल तेल सर्वोत्तम समजलं जातं. तुम्ही खोबरेल तेल, ऑलिव्ह ऑईल, पेपरमिंट ऑईलने मसाज करा. यामुळेही योग्य पोषण मिळेल आणि दाढी चांगली दिसेल. ✻ दाढी चांगली राहण्यासाठी आहारात व्हिटॅमिन बी १, बी ६, बी १२ युक्त पदार्थांचा वापर करावा. यामुळे केसांचं उत्तम पोषण होईल.

# नातं योग्य आहे का?

**मॅच मेकिंग**

मी आर्थिकदृष्ट्या सक्षम २७ वर्षांची तरूणी असून पाच वर्षांनी लहान असलेल्या मुलाच्या प्रेमात पडले आहे. आम्ही शेजारी आणि बालपणीचे मित्र आहोत. आमच्या कुटुंबियांना हे नातं मान्य होणार नाही, याची मला कल्पना असली तरी या नात्याला एक संधी द्यावी, असं मला वाटतं. बहुतेक त्यालाही मी आवडते. दुसरं म्हणजे तो फक्त २२ वर्षांचा असून मास्टर्स अभ्यासक्रमाची तयारी करत आहे. या नात्याचं मर्म त्याला कळेल का? वयातल्या अंतरामुळे भविष्यात काही समस्या निर्माण होतील का? मी खूप गोंधळून गेले आहे.



**उत्तर** :बराच काळ एकत्र घालवल्यानंतर एखाद्याबद्दल आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे. पण हे फक्त आकर्षण आहे का प्रेम, हे जाणून घे. त्यातच त्याला तू आवडतेस किंवा नाही याबद्दल निश्चित असं काहीच सांगता येत नाही. त्यामुळे याबाबत स्पष्टपणे बोल. त्याला आत्ता नातेसंबधात अडकायचं आहे का, हे जाणून घे. अवघा २२ वर्षांचा हा मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर झालेला नाही. त्यामुळे तू एखाद्या समुपदेशकाची मदत घे. भविष्याचा विचार सध्या तरी करू नकोस. सद्यस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न कर. नात्यात समर्पण आणि विश्वासाची गरज असते. वयातल्या अंतरावर मात करून अनेकजण सुखी संसार करत आहेत. पण आधी या मुलाच्या मनातलं जाणून घे आणि मगच पुढे जा.

# पास्त्याला द्या ट्विस्ट

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, तुम्हाला पास्ता आवडत असेल. भरपूर चीज घातलेला, रेड किंवा व्हाईट सॉसमधला पास्ता बघितला की तोंडाला पाणी सुटतं. याच पास्त्याला आपण देसी ट्विस्ट देऊ शकतो. हा पास्ता करायची पद्धत अगदी सोपी आहे. चला तर मग, या इंडियन स्टाईल पास्ताची रेसिपी जाणून घेऊ या.

**साहित्य** : एक कप पास्ता, चार कप पाणी, चिरलेला कांदा, टोमॅटो, चमचाभर आलं-लसूण पेस्ट, दोन हिरव्या मिरच्या चिरून घ्या. लाल तिखट, गरम मसाला, एक चमचा मैदा, तीन चमचे दूध, ऑलिव्ह ऑईल(नेहमीचं तेलही चालेल), मीठ, चिरलेली कोथिंबिर

**कृती**: भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात थोडं मीठ आणि तीन ते चार थेंब तेल घाला. पाणी उकळल्यावर त्यात पास्ता घाला. सहा ते आठ मिनिटं शिजवून घ्या. पाणी काढून पास्ता बाजूला ठेवा. कढईत दोन चमचे तेल गरम करा. कांदा आणि हिरव्या मिरच्या परतून घ्या. त्यात आलं लसूण पेस्ट घालून हलवा. यानंतर टोमॅटो घालून शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजले की त्यात मैदा घाला. परतून घ्या. यात दूध, चवीनुसार लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घाला. दूध नको असेल तर त्याऐवजी पास्ता शिजवलेलं पाणी घालता येईल. आता सर्व पदार्थ एकजीव करा. मीठ आणि तिखटाचं प्रमाण थोडं जास्त ठेवा. कारण आपल्याला अजून पास्ता घालायचा आहे. या मसाल्यात पास्ता घालून नीट हलवून घ्या. पास्त्याला नीट मसाला लागला पाहिजे. गॅस बंद करा. वरून कोथिंबिर घाला. गरमागरम खा.



# अनुभवा सर्फिंगचा थरार

**भटकंती**

आपल्या भारतातही वॉटर स्पोर्टस बरंच लोकप्रिय होत आहे. स्कुबा डायव्हिंग, रिव्हर राफ्टींग, सर्फिंग, मोटर बोटची सफर असे बरेच पर्याय उपलब्ध आहेत. वॉटर स्पोर्टसचा थरार वेगळाच असतो. तुम्हाला सर्फिंग करावंसं वाटत असेल तर भारतातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांना भेटी देता येतील. सर्फिंगचे हे काही देसी पर्याय...

✻ वॉटर स्पोर्टसचा भन्नाट अनुभव घेण्यासाठी पुड्डूचेरीला भेट द्या. इथले स्वच्छ आणि सुंदर समुद्रकिनारे तुम्हाला आकर्षित करतील. इथल्या समुद्रातल्या लाटांवर स्वार होऊन मस्तपैकी सर्फिंग करता येईल. इथला सेरेनिटी समुद्रकिनरा सर्फिंगसाठी प्रसिद्ध आहे. तसंच अन्य आकर्षक समुद्रकिनारेही आहेत.

✻ केरळ हे भारतातल्या सुंदर राज्यांपैकी एक. केरळचा कोवलम समुद्रकिनारा खूप प्रसिद्ध आहे. इथेही सागराच्या उंच उंच लाटांवर स्वार होऊन सर्फिंगचा आनंद लुटता येईल.

✻ कर्नाटकमधल्या गोकर्णचा समुद्रकिनारा खास आहे. हा समुद्रकिनारा पर्यटकांचं खास आकर्षण ठरतो. हा समुद्रकिनाराही सर्फिंगसाठी उत्तम मानला जातो. इथे बरेच पर्यटक सर्फिंगसाठी येतात. इथल्या महाबळेश्वर मंदिराला भेट दिल्यानंतर लोक गोकर्णच्या समुद्रकिनाऱ्यावर येऊन सर्फिंगचा थरार अनुभवतात. तुम्हीही अशी एखादी सहल ठरवू शकता.

✻ गोवा हे पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. देशाविदेशातले पर्यटक गोव्याला भेट देत असतात. इथले शांत आणि सुंदर समुद्रकिनारे पर्यटकांचं मन मोहवून टाकतात. इथला निसर्ग प्रेमात पाडतो. गोव्यातही सर्फिंगची संधी मिळते. इथे बरेच सर्फिंग पॉईंट्स आहेत. इथल्या समुद्रकिनाऱ्यांवर निवांत सर्फिंग करता येईल.

यंदा पर्यटनाच्या काही वेगळ्या वाटा निवडून आनंद द्विगुणित करता येईल.



# इंजिनिअरिंग इन रबर टेक्नॉलॉजी

**वेगळ्या वाटा**

दोस्तांनो, इंजिनिअरींग म्हटलं की ठराविक शाखांचा विचार मनात येतो. सॉफ्टवेअर, कॉम्प्युटर, सिव्हिल, ऑटोमोबाईल या इंजिनिअरींगच्या कॉमन शाखा आहेत. सहसा कुणी या पर्यायांपलीकडे बघत नाही. पण इंजिनिअरींगचं क्षेत्र प्रचंड मोठं आहे. सरधोपट शाखा निवडायच्या नसतील तर रबर टेक्नॉलॉजीचा पर्याय तुमच्याकडे आहे.

✻ रबराचा वापर प्रत्येक क्षेत्रात केला जातो. रबर टेक्नॉलॉजी ही इंजिनिअरींगची शाखा असेल असा विचार आपल्या मनात सहसा डोकावत नाही. पण या क्षेत्रात तुम्ही उत्तम भविष्य घडवू शकता.

✻ रबर टेक्नॉलॉजीत रबराच्या विविध वस्तू घडवल्या जातात. नैसर्गिक रबरापासून लेटेक्स आणि सिंथेटिक रबरवर प्रक्रिया केली जाते. या रबरांपासून वेगवेगळी उत्पादनं बनवली जातात.

✻ बारावीत फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणित हे विषय घेऊन रबर टेक्नॉलॉजी निवडता येईल. रबर टेक्नॉलॉजीशी संबंधित अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बीई, बीटेक, डिप्लोमा यापैकी कोणताही पर्याय तुम्हाला निवडता येईल.



✻ हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर टेस्टिंग टेक्नॉलॉजिस्ट, टेक्निशियन, प्रोडक्शन इंजिनिअर, पॉलिमर स्पेशलिस्ट, मटेरियल टेक्नॉलॉजिस्ट अशा विविध पदांवर काम करता येईल.

✻ रबर क्षेत्रासोबतच ऑटोमोबाईल क्षेत्रातही तुम्ही काम करू शकता. सरकारी क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत.

✻ गुजरात टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, गांधीनगर, इंडियन रबर इन्स्टीट्यूट कोलकाता, हिंदुस्तान कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, चेन्नई, आयआयटी खरगपूर या ठिकाणी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले. This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर - No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.

## रत्नागिरी एसटी विभागातर्फे दिवाळीसाठी २०० जादा फेऱ्या धावणार



◆ रत्नागिरी (वार्ताहर) :

रत्नागिरीसह इतर तालुक्यात कामानिमित्त वास्तव्यास असणाऱ्या इतर जिल्ह्यातील चाकरमानी मोठ्या संख्येने दिवाळीनिमित्त आपल्या गावी जात असतात. त्यामुळे या प्रवाशांची गैरसोय होऊ नये, त्यांचा प्रवास चांगला, सुखकर व्हावा यासाठी रत्नागिरी एस.टी. विभागाच्या वतीने १६ ते २६ ऑक्टोबरच्या दरम्यान पश्चिम महाराष्ट्र, विदर्भात दररोज १५ ते २० अशा २०० जादा फेऱ्या सोडण्यात येणार आहेत. त्याचे नियोजन झाले असून प्रवाशांचा प्रतिसाद पाहून आणखीन जादा बसेस सोडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

कित्येकजण कामानिमित्त, व्यवसाय, शिक्षण, नोकरीनिमित्त कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात आले आहेत. मात्र सणासुदीत येथील चाकरमानी आपल्या मूळ गावी हमखास जातोच. दिवाळीच्या पार्श्वभूमीर सर्वांनाच आपल्या गावाकडे जाण्याची ओढ असते. त्यात अनेक महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी अनेक प्रवाशी योजना असल्याने प्रवासी लालपरीलाच पसंती देतात. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होवू नये, त्यांचा चांगला व आरामदायी प्रवास होण्यासाठी रत्नागिरी एसटी विभागाच्या वतीने २०० हून अधिक जादा फेऱ्यांचे नियोजन केले आहे.

**या ठिकाणी धावणार लालपरी**

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर तर विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, बुलढाणा या जिल्ह्यांत दिवाळीसाठी जादा गाड्या धावणार आहेत.

जिल्ह्यातील चाकरमानी, प्रवाशांनी आताच तिकीट आरक्षण करून घ्यावे, असेही आवाहन एस.टी. विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय एस.टी. महामंडळाने घेतला होता. मात्र राज्यातील पूरपरिस्थिती पाहता एस.टी.ची हंगामी भाडेवाढ मागे घेण्याचे आदेश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी परिवहनमंत्री सरनाईक यांना दिले होते. त्यामुळे हंगामी भाडेवाढ रद्द झाल्यामुळे प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# सहा राज्यात ७ ठिकाणी होणार पोटनिवडणुका

## निवडणूक आयोगाकडून मतदान, निकालाची तारीख जाहीर

◆ लखनौ (वृत्तसंस्था) :

बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. बिहार विधानसभा निवडणुका दोन टप्प्यात होणार आहे. ६ नोव्हेंबर आणि ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मतदान होईल. यासह सहा राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील आठ जागांसाठी पोटनिवडणुका एकाच दिवशी होणार आहेत. या सर्व निवडणुकांचे निकाल १४ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर केले जातील. निवडणूक आयोगाने आठ विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणुकांची घोषणा केली आहे. या पोटनिवडणुका विविध कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांमुळे झालेल्या आहेत. जम्मू




आणि काश्मीरमधील बडगाम आणि नागरोटा येथे पोटनिवडणूक होणार आहे. उमर अब्दुल्ला यांच्या राजीनाम्यामुळे आणि देवेंद्र सिंह राणा यांच्या निधनामुळे येथील जागा रिक्त झाल्या आहेत. तर, कंवरलाल यांना अपात्र घोषित करण्यात आल्यामुळे राजस्थानच्या अंता विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. रामदास सोरेन यांच्या निधनामुळे झारखंडमधील घाटसिला परिसरात, मागंती गोपीनाथ यांच्या निधनामुळे तेलंगणातील जुबली हिल्समध्ये, डॉ. काश्मीर सिंग सोहल यांच्या निधनामुळे पंजाबमधील तरनतारन येथे पोटनिवडणूक होणार आहे. लालरिंतलुआंगा सायलो यांच्या निधनामुळे मिझोरममधील राजेंद्र ढोलकिया यांच्या निधनामुळे ओडिशातील नुआपाडा येथे पोटनिवडणूक होणार आहे. जम्मू काश्मीर आणि ओडिसा येथील पोटनिवडणुकीसाठी १३ ऑक्टोबर रोजी नोटीस जारी होईल. २० ऑक्टोबर २०२५ ही अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असेल. २२ ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी होईल. झारखंड, मिझोरम, पंजाब तेलंगण येथील पोटनिवडणुकीसाठी १३ ऑक्टोबरला नोटीस जारी होईल. २१ ऑक्टोबर २०२५ ही अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असेल. २२ ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी केली जाईल. राजस्थान येथील येथील पोटनिवडणुकीसाठी १३ ऑक्टोबर रोजी नोटीस जारी होईल. २१ ऑक्टोबर ही अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असेल. २३ ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी केली जाईल. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी या सर्व जागांवरील पोटनिवडणुकांसाठी मतदान होईल. तर १४ला मतमोजणी होणार आहे.

## १५ ते १९ ऑक्टोबर दरम्यान कणकवलीत दिवाळी बाजाराचे आयोजन

### पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते उद्घाटन



◆ कणकवली (वार्ताहर) :

भाजप पुरस्कृत समीर नलावडे मित्रमंडळाच्यावतीने १५ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत दिवाळी बाजार भरवण्यात येणार आहे. पालकमंत्री ना. नितेश राणे यांच्या नेतृत्वाखाली कणकवलीकरांनी ही नगरपंचायत दिल्यानंतर सलग आठव्या वर्षी दिवाळी बाजाराचे आयोजन करण्यात आले आहे. कणकवली शहरात बचत गटाच्या माध्यमातून रोजगार निर्माण केला जातोय. त्यांना व्यासपीठ देण्यासाठी दिवाळी बाजार भरवत आहे. या बाजारात दिवाळीच्या फराळाची विक्री करता येणार आहे. १५ ऑक्टोबर रोजी पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते सायंकाळी ५ वाजता या बाजाराचे उद्घाटन होणार असल्याची माहिती माजी नगराध्यक्ष समीर नलावडे यांनी दिली.

कणकवली येथील भाजप कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी शहराध्यक्ष अण्णा कोदे, माजी उपनगराध्यक्ष बंडू हर्णे, अभिजित मुसळे, सोमा गायकवाड, किशोर राणे, गौरव हर्णे आदी मान्यवर उपस्थित होते.

या दिवाळी बाजारात कुंभार समाजातील हाताने तयार केलेली भांडी आहेत, त्यांना १० स्टॉल राखीव ठेवण्यात आले आहेत. तसेच शहरातील बचतगट लोकांसाठी ३० स्टॉल आहेत. त्या महिलांनी स्वतः बनवलेल्या वस्तू असाव्यात दुकानातील माल पाहून विक्री करता येणार नाही. या बाजारात ४० स्टॉल असतील. त्या सर्वांना लागणारी टेबल, खुर्चा, लाईट मोफत व्यवस्था दिली जाणार आहे. हा दिवाळी बाजार ऑटो रिक्षा चालक मालक गणपती प्रतिष्ठापना होते, तिथे होणार आहे. १५ ऑक्टोंबर रोजी नाम. नितेश राणे यांच्या हस्ते सायंकाळी ५ वाजता होणार उद्घाटन होणार आहे. १९ ऑक्टोंबर पर्यंत हा बाजार राहणार आहे. सर्व व्यवस्था स्टॉल धारकांना मोफत सेवा देण्यात येणार आहे. या बाजारासाठी नाव नोंदणी शहराध्यक्ष अण्णा कोदे ९४२२३८१९००,८२०८८२८६८६ यांच्याकडे करा, असे आवाहन समीर नलावडे यांनी केले आहे.

## मागण्यांचा टीझर सादर करत एसटी कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

◆ मुंबई (प्रतिनिधी):

महागाई भत्ता फरक, वेतनवाढ फरक रक्कम, दिवाळी भेट रक्कम, सण उचल आदी मागण्यांचे फलक व पेटती मशाल हातात घेऊन राज्यातील ५०० पेक्षा जास्त एसटीतील कामगार प्रतिनिधींनी १२ ऑक्टोबर पासून होणाऱ्या आंदोलनाच्या टीझरचे सादरीकरण केले असून एसटी प्रशासनाला गंभीर इशारा दिला आहे. मुदती पूर्वी प्रश्न सुटले नाहीत तर आंदोलन तीव्र करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिला आहे. ते आज दादरच्या टिळक भवन येथील सभागृहात एसटी कामगारांच्या प्रलंबित मागण्यासाठी १२ ऑक्टोबर रोजी रात्री बारा वाजल्यापासून होणाऱ्या बेमुदत आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या टीझर सादरीकरण सभेत बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, एसटी कामगारांच्या चळवळीच्या इतिहासात पहिल्यांदाच मशाल मोर्चा काढण्यात येणार असून तो १२ ऑक्टोबरच्या रात्री बारा वाजल्यापासून सुरू होईल. यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये ही आमची इच्छा असून प्रशासनाने सुद्धा याकडे



गंभीरतेने लक्ष दिले पाहिजे. असेही बरगे यांनी यावेळी सांगितले. प्रलंबित मागण्याकडे लक्ष वेधताना ते म्हणाले की, सन २०१६ पासूनचा एसटी कामगारांचा ११०० कोटी रुपयांचा महागाई भत्त्याचा फरक मिळालेला नसून वेतनवाढ फरकाची २३१८ कोटी रुपयांची रक्कम देण्यात आलेली नाही.या शिवाय १७००० हजार रुपये इतकी रक्कम दिवाळी भेट म्हणून देण्यात आली पाहिजे. १२५०० सण उचल मिळाली पाहिजे अशा अनेक प्रकारच्या मागण्या आजही प्रलंबित असून वेगवेगळ्या प्रकारच्या एकूण थकीत रक्कमेचा आकडा चार हजार कोटी रुपयांवर गेला आहे. रक्कम विभागून द्यायची झाली तर हा आकडा सरासरी तीन लाख ७७ हजार रुपये इतका होणार असून ही संपूर्ण रक्कम हडप करण्याचा डाव प्रशासनाने रचला असून ही रक्कम कधी मिळेल हे प्रशासनाने जाहीर करावे.

## महत्वाचे

### सप्तशृंग गडावरील कोजागिरी पौर्णिमा



**नाशिक :** नवरात्र संपताच संपूर्ण महाराष्ट्राला वेध लागतात ते कोजागिरी पौर्णिमेच्या उत्साहाचे. परंतु, नाशिक जिल्ह्यातील वणी येथील स्वयंभू देवीचे स्थान असलेल्या सप्तशृंग गडावर ही पौर्णिमा केवळ धार्मिक उत्सव न राहता, ती सामाजिक एकात्मता आणि पारंपरिक लोकसंस्कृतीचा एक अद्वितीय संगम म्हणून ओळखली जाते. हजारो भाविकांच्या उपस्थितीत, देवीचा दुधाचा प्रसाद, विविध भागातून आलेल्या भक्तांची कावड यात्रा आणि गडाच्या परंपरेला जपणारा तृतीयपंथीयांचा छबिना या तिहेरी वैशिष्ट्यांमुळे कोजागिरी पंर्णिमेचा सोहळा अविस्मरणीय ठरतो. सप्तशृंग निवासिनी देवी, जी महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे, तिच्या साक्षीने हा उत्सव गडाच्या पौराणिक आणि सांस्कृतिक वैभवात मोठी भर घालतो आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री चंद्र सोळा कलांनी परिपूर्ण होतो. या चंद्रकिरणांमध्ये अमृततत्त्व उतरते, अशी हिंदू धर्मात दृढ श्रद्धा आहे. याच श्रद्धेपोटी सप्तशृंग गडावर मध्यरात्री देवीची महापूजा झाल्यानंतर खास तयार केलेले आटवलेले दूध मोठ्या प्रमाणावर चंद्रप्रकाशाखाली ठेवले जाते. या दुधात औषधी आणि समृद्धी देणारी शक्ती येते, या भावनेतून हे प्रसाद दूध रात्रभर जागृत राहणाऱ्या भाविकांना वाटले जाते. या दिवशी हजारो कावडीधारक आणि भाविक सप्तशृंग गडावर दाखल होतात, ज्यामुळे गडावर एक विशेष उत्साहाचे वातावरण असते.

## माउंट एव्हरेस्टला हिमवादळाचा तडाखा

### १ हजार गिर्यारोहक अडकले, बचावकार्य सुरू

◆ नेपाळ (वृत्तसंस्था) :

जगातील सर्वात उंच शिखर असलेल्या माउंट एव्हरेस्टला हिमवादळाचा तडाखा बसला आहे. तिबेटमधील माउंट एव्हरेस्टच्या पूर्वेकडील भागात हिमवादळामुळे हिमवृष्टी तीव्र झाली आहे. या हिमवादळामध्ये १००० गिर्यारोहक अडकले आहेत. त्यांना वाचवण्यासाठी बचावकार्य करण्यात येत आहे. ४,९०० मीटरपेक्षा जास्त



उंचीवर असलेल्या या प्रदेशातील रस्ते बंद झाले आहेत. त्यामुळे पर्यटकांना परत येण्यासाठी पर्यायी रस्ते राहिले नाहीत. रस्त्यावर आलेला बर्फ काढण्यासाठी शेकडो स्थानिक ग्रामस्थ आणि बचाव पथके तैनात करण्यात आली आहेत.

हिमवादळामध्ये अडकलेल्या काही पर्यटकांना आधीच वाचवण्यात आले आहे. शुक्रवारी संध्याकाळपासून सुरू झालेल्या हिमवृष्टीमुळे तिबेटमधील माऊंट एव्हरेस्टच्या पूर्वेकडील भागात हिमवृष्टी तीव्र झाली. माउंट एव्हरेस्ट गिर्यारोहकांसाठी प्रसिद्ध आहेत. माउंट एव्हरेस्टवर ट्रेकिंगसाठी मोठ्या संख्येने गिर्यारोहक येतात. हे शिखर जगातील सर्वात उंच असून ते ८८,८४९ मीटरपेक्षा जास्त उंचीचे आहे. हे शिखर चीनमध्ये माउंट कोमोलांगमा म्हणून ओळखले जाते.

## राष्ट्रपती भवनात ऋषभ शेट्टीच्या 'कांतारा'ची विशेष स्क्रिनिंग

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे. चित्रपटाचा पहिला भाग खूपच यशस्वी झाला. आता, त्याचा दुसरा भागही चांगली कमाई करत आहे. हा चित्रपट परदेशातही चांगली कमाई करत आहे. आता, या चित्रपटाला भारतात एक मोठा सन्मान मिळाला आहे. हा चित्रपट राष्ट्रपती भवनात प्रदर्शित झाला. या चित्रपटाची निर्माती आणि मुख्य भूमिका साकारणारी अभिनेत्री रुक्मिणी वसंत देखील



यावेळी उपस्थित होती.

ऋषभ शेट्टीच्या चित्रपटाचे सर्वत्र कौतुक होत आहे. चित्रपटाचे पौराणिक संबंध त्याला आणखी लोकप्रिय बनवत आहेत. चित्रपटाच्या कथानकाची आणि निर्मितीची प्रशंसा केली जात आहे.

पहिल्या भागाला राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आणि ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला. आता, चित्रपटाचा दुसरा भाग आंतरराष्ट्रीय बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे, तर राष्ट्रीय स्तरावरही या चित्रपटाची चर्चा आहे. राष्ट्रपती भवनात प्रदर्शित होणारा कोणताही चित्रपट हा स्वतःच एक मोठा सन्मान आहे.

## गुरुवारी राज्यातील ओला, उबर सेवा बंद

### कॅब-रिक्षाचालक जाणार संपावर

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

परिवहन विभागाच्या गलथान कारभाराकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लक्ष वेधण्यासाठी तसेच कॅब, रिक्षा व टॅक्सीचालक यांच्या मागण्यांची अंमलबजावणी न झाल्याने गुरुवारी (दि.९) प्रवासी सेवा एक दिवस बंद ठेवण्याचा निर्णय भारतीय गिग कामगार मंचने घेतला आहे. मंच अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी ही माहिती दिली.

डॉ. केशव क्षीरसागर म्हणाले, परिवहन विभागाच्या गैरकारभाराविरोधात कॅब, रिक्षा व टॅक्सी चालकांचे १५ जुलै २०२५ पासून उपोषण, निदर्शने, सेवा बंद अशा विविध पद्धतीने आंदोलने सुरू आहेत. ओला, उबर, रॅपिडो या तीनही कंपन्या सरकारी नियमांना पायदळी तुडवून बेकायदेशीरपणे राज्यात काम करत आहेत. एफआयआर दाखल केल्यानंतरही काम करत आहेत. खासगी दुचाकीवरून प्रवासी सेवा सुरूच आहे. ३० सप्टेंबरला आझाद मैदानात केलेल्या आंदोलनावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी भेट नाकारली. त्यामुळे आंदोलक सरनाईक यांच्या मुंबईतील शासकीय निवासस्थानी जात असताना त्यांना आझाद मैदान पोलिसांनी अडवून ताब्यात घेतले. त्यांना यलो गेट पोलीस ठाण्यात आणले. त्यानंतर मुख्यमंत्री यांचे सचिव विद्याधर महाले यांनी आंदोलक व परिवहन विभागाचे अधिकारी यांच्यासमवेत मंत्रालयात बैठक घेऊन त्यावर तोडगा काढू, असे निर्देश सहाय्यक आयुक्त भरत कळस्कर यांना दिले होते. परंतु त्यानंतर कार्यवाही झाली नाही. गेले ६ दिवस यावर कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे बंदचा निर्णय गिगने घेतला आहे.

मुंबईत सुमारे साडेसात लाख, त्या खालोखाल पुण्यात ३ लाख, तर नागपूर व नाशिकमध्ये प्रत्येकी २ लाख असे कॅब, टॅक्सी व रिक्षाचालक आहेत. प्रवासी सेवा बंदमुळे चालकांना त्याचबरोबर प्रवाशांनाही फटका बसणार आहे.

## वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्काराची घोषणा




◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

वैद्यकशास्त्रातील (मेडिसिन) २०२५ चा नोबेल पुरस्कार अमेरिकेच्या मेरी ई. ब्रंकॉ आणि फ्रेड रैम्सडेल तसेच जपानचे शिमोन साकागुची या तीन वैज्ञानिकांना मिळाला आहे. या तिघांना पेरीफेरल इम्यून टॉलरन्स (Peripheral Immune Tolerance) या विषयावरील संशोधनासाठी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार विभागून देण्यात आला आहे.

त्यांच्या पेरीफेरल इम्यून टॉलरन्सवरील संशोधनामुळे कर्करोग आणि अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारात नवे दार उघडले आहे. त्यांच्या या शोधामुळे शरिराची इम्युन सिस्टिम समजून घेण्यासाठी खूप उपयुक्त ठरली आहे. यामुळे रुमेटाईड आर्थराटिस, टाइप १ प्रकारचा डायबेटीस व ल्यूपस सारख्या रोगांसाठी सुलभरित्या उपचार करता येतील.

तसेच प्रतिरक्षा प्रणालीतील "रेग्युलेटरी T-कोशिका (Regulatory T cells)" या प्रकारच्या कोशिकांचा शोध आणि त्यांचे कार्य समजून घेणे यामुळे, ऑटोइम्युन रोग (immune system च्या चुकीच्या प्रतिक्रिया) या आजारांवर उपचारांच्या दिशेने वाट उघडण्यास मदत होईल. असे नोबेल समितीने पुरस्काराची घोषणा करताना म्हटले आहे.

पुरस्काराची घोषणा काल ६ ऑक्टोबर २०२५ रोजी स्टॉकहोममधील कारोलिंस्का इंस्टिट्यूटने केली आहे. या पुरस्काराची रक्कम ११ दशलक्ष स्वीडिश क्रोन (SEK) इतकी आहे ती विजेत्यांमध्ये विभागून दिली जाईल.

## स्थलांतरित कुटुंबांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासन अलर्ट

◆ नंदुरबार (वार्ताहर) :

नंदुरबार जिल्ह्यात लागलेल्या स्थलांतरांचा कलंक पुसण्यासाठी जिल्हा प्रशासन आता अलर्ट मोडवर आहे. नंदुरबार जिल्ह्यातून दरवर्षी मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव इतर जिल्ह्यात आणि राज्यात रोजगारासाठी स्थलांतर होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. स्थलांतराचे प्रमाण रोखण्यासाठी आता प्रशासनाने कंबर कसली असून जिल्हाधिकारी मिताली सेठी यांनी 'मूळवाट' हा नवीन उपक्रम हाती घेतला आहे. स्थलांतर, गरीबी आणि रोजगाराच्या कमतरतेमुळे गाव



सोडून जाणाऱ्या हजारो कुटुंबांच्या समस्या या उपक्रमा अंतर्गत आता स्थानिक पातळीवरच सोडवल्या जाणार आहेत. हंगामी स्थलांतरामुळे अनेकदा महिलांना आणि बालकांना आरोग्य आणि पोषणाच्या गंभीर समस्यांचा सामना करावा लागतो. परंतु जर रोजगार आपल्या गावातच उपलब्ध झाला तर कोणालाही आपलं घर सोडावं लागणार नाही. यासाठी प्रशासनाने पुढील सहा महिन्यांसाठी मनरेगा अंतर्गत नियोजनबद्ध कामांची रूपरेषा तयार केली आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीकडे कामाची उपलब्धता निश्चित करण्यात आली असून, कामाच्या अभावामुळे स्थलांतर होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तरीही स्थलांतर झाल्यास, नागरिकांनी आपल्या ग्रामपंचायत किंवा अंगणवाडी कार्यालयात मुकादमाचे नाव आणि जिल्ह्याचे नाव नोंदवावे. यामुळे स्थलांतराच्या ठिकाणी अडचण आल्यास प्रशासनाला तत्काळ मदत करता येईल. प्रशासनाने कामाच्या ठिकाणी उद्भवणाऱ्या अडचणींसाठी दोन हेल्पलाईन क्रमांक सुरू केले आहेत: मजदूर हेल्पलाईन : १८०० १२० ११२११, महिला व बालक हेल्पलाईन: १८०० ३००० २८५२ या क्रमांकावर संपर्क साधून रोजगार, रेशन, आरोग्य सेवा संबंधित कोणतीही समस्या सोडवली जाणार आहे. मूळवाट हा उपक्रम नंदुरबारच्या प्रत्येक नागरिकासाठी सशक्त भविष्याचा मार्ग आहे. यांच्या प्रयत्नांमुळे आज ग्रामीण भागात रोजगार निर्माण होऊन गावोगावी आत्मनिर्भरतेचा प्रवास सुरू झाला.

## नाशिकला आधुनिक चित्रनगरी उभारणार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला जागतिक मनोरंजन क्षेत्राचे केंद्र बनविण्याचा दृष्टिकोन मांडला आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात आघाडी घ्यावी, या उद्देशाने नाशिक चित्रनगरी प्रकल्प निर्णायक ठरेल. या प्रकल्पामुळे स्थानिक कलाकार, तंत्रज्ञ, लघुउद्योग, हॉटेल व्यवसाय, पर्यटन, वाहतूक व सेवा क्षेत्रांना मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल. नाशिकच्या सर्वांगीण आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाला नवे बळ मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. नाशिक येथे चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी शासन सकारात्मक आहे. यासाठी नेमलेल्या तज्ञ सल्लागारांचा अहवाल आल्यानंतर त्यातील व्यवहार्यता तपासून, त्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात नाशिक चित्रनगरी प्रकल्पासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

## लांबलेल्या पावसाचा कोकणातील आंबा उत्पादनावर परिणाम

# या वर्षीही हापूसची चव उशिराच; आंबा बागायतदार चिंतेत !

◆ रत्नागिरी (वार्ताहर) :

यंदा पावसाने मुक्काम वाढविला आहे. या लांबलेल्या पावसाचा परिणाम कोकणातील आंबा उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. दरवर्षी जानेवारी महिन्यात हापूसची पहिली पेटी बाजारात येते. मात्र यावर्षी फेब्रुवारी-मार्चपर्यंत हापूसची प्रतीक्षा करावी लागेल, असे आंबा उत्पादकांकडून सांगण्यात येत आहे. या वर्षीही आंबा पिकावर हवामानाचा परिणाम होण्याची शक्यता असून आंबा उत्पादकांसाठी ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे यावर्षी खवय्यांना हापूस आंब्याची चव उशिराच



चाखायला मिळणार आहे.,

आंबा हे कोकणातील प्रमुख पारंपरिक बागायती पीक आहे. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आंब्याची मोठ्या प्रमाणात लागवड आहे. आंबा उत्पादनात हापूस आंब्याला विशेष महत्त्व आहे. आंबा पिकाची हेक्टरी उत्पादकता २.५० मेट्रिक टन आहे. कोकणातील खास करून रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हापूस हा जगप्रसिद्ध आहे.

सुमारे २५ हजार मेट्रिक टन हापूस निर्यात होतो. दरवर्षी युरोपियन देशांसह दुबई, सिंगापूर आणि मध्य आशियातील इतर देशांमध्येही हापूस आंब्याची निर्यात होते. पणन मंडळाच्या सुविधांचा वापर करून अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, न्यूझीलंड, मलेशिया इ. देशांमध्ये आंबा निर्यात होतो. कोकणातील आंबा उत्पादनाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर गेल्या काही वर्षात महत्त्व वाढले आहे. मात्र हाच हापूस आंबा सातत्याने हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत आहे. त्यामुळे अवेळी पाऊस, वाढते तापमान याचा परिणाम उत्पादनावर होत आहे. हवामानातील बदलांचा परिणाम आंब्याच्या उत्पादनावर आणि गुणवत्तेवरही होत आहे. आंब्याला फुले, फळे येण्यासाठी आणि निरोगी फळांमध्ये परिपक्वता येण्यासाठी विशिष्ट हवामान परिस्थितीची आवश्यकता असते. मात्र सातत्याने हवामान बदलामुळे यंदा हापूसचे पीक धोक्यात आले आहे.


## व्हॉट्‌ॲपवर नंबर नाही; आता दिसेल 'युजरनेम'

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

प्रायव्हसीची (गोपनीयतेची) काळजी घेणाऱ्यांसाठी एक मोठी आणि चांगली बातमी आहे. लवकरच व्हॉट्‌ॲप एक असं फीचर आणत आहे, ज्यामुळे तुम्हाला कोणाशीही चॅट करताना तुमचा फोन नंबर दाखवण्याची गरज पडणार नाही. सध्या व्हॉट्‌ॲप वर तुम्ही कोणालाही मेसेज केल्यास, त्या व्यक्तीला तुमचा फोन नंबर दिसतो. मात्र, येणाऱ्या नवीन फीचरमुळे तुमचा नंबरऐवजी फक्त तुमचं युनिक यूजरनेम (Unique Username) दिसेल.

काय आहे 'यूजरनेम' (Username) फीचर?

या नवीन फीचरला 'यूजरनेम' (Username) असं नाव देण्यात आलं आहे. जे वापरकर्ते मेसेज पाठवताना आपला नंबर शेअर करू इच्छित नाहीत, त्यांच्यासाठी हे फीचर खूप फायदेशीर ठरणार आहे. या फीचरमुळे तुम्ही तुमचा आवडता यूजरनेम तयार करू शकाल. हा




यूजरनेम तुमच्या प्रोफाइलवर दिसू शकेल आणि लोक तुमच्याशी तुमच्या नंबरऐवजी या यूजरनेमद्वारेच जोडले जातील. गोपनीयता (Privacy) वाढवण्यासाठी हे फीचर खूप महत्त्वाचे ठरणार आहे.

टेस्टिंग फेजमध्ये आहे फीचर

WABetaInfo ने व्हॉट्‌ॲपच्या बीटा वर्जन 2.25.28.12 मध्ये या नवीन फीचरबद्दल माहिती दिली आहे. म्हणजेच, हे फीचर सध्या चाचणी (Testing) अवस्थेत आहे. लवकरच ते सर्व वापरकर्त्यांसाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

यूजरनेम (Username) कसा निवडायचा?

WhatsApp यूजरनेम निवडण्यासाठी काही नियम लागू करत आहे:

यूजरनेमची (Username) सुरुवात 'www' ने होऊ शकत नाही.

त्यामध्ये किमान एक अक्षर असणे आवश्यक आहे.

तुम्ही अंक, अंडरस्कोर (_) आणि डॉट (.) यांसारखे काही विशिष्ट कॅरेक्टर्स वापरू शकता.

या नियमांमागे कोणतीही फर्जी प्रोफाइल (Fake Profile) तयार होऊ नये किंवा कोणी वेबसाइट किंवा ब्रँडसारखे नाव निवडू नये, हा उद्देश आहे.

असं यूजरनेम-आधारित चॅटिंग फीचर टेलिग्राममध्ये (Telegram) आधीपासूनच उपलब्ध आहे. त्यामुळे यूजर्सना नंबर शेअर न करता बोलता येतं. त्यामुळे हे फीचर व्हॉट्‌ॲपच्या प्रायव्हसी पर्यायांमध्ये एक मोठे पाऊल ठरणार आहे.